# नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ३६८/१४ मधील
# निशाणी क्र. ३१ वर आदेश

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ ने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदींनुसार वादी व प्रतिवादी क्र. १ विरूध्द तात्पुरता मनाई आदेश पारित करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, मौजे पांढरेवाडी येथील गट क्र. ९१/२/ब/१ क्षेत्र ० हे. ८६ आर. ची मिळकत प्रतिवादी क्र. १ च्या खरेदी मालकी वहिवाटीची असून सदर मिळकतीपैकी पूर्व बाजुची ४० आर. जमीन प्रतिवादी क्र. १ ने ट्रॅक्टर व ट्रॉली खरेदीसाठी प्रतिवादी क्र. २ ला दि. २१/१२/२०१२ रोजी खरेदी दिली. त्यानंतर प्रतिवादी क्र. २ ने सदरची मिळकत दि. २२/०५/२०१४ रोजी प्रतिवादी क्र. ३ कडून २,८०,०००/— रुपये स्वीकारून प्रतिवादी क्र. १ व वादीच्या सहमतीने प्रतिवादी क्र. ३ ला विकली. तेव्हापासून सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. ३ ची खरेदीदार मालक हया नात्याने प्रत्यक्ष कब्जे—वहिवाट आहे. सदर प्रतिवादी क्र. ३ हा सदर मिळकतीचा प्रामाणिक खरेदीदार आहे. त्याप्रमाणे महसूल दप्तरी प्रतिवादी क. ३ चे नाव दाखल झाले आहे. प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. २ ला सदरची मिळकत कायदेशीर गरजेपोटी विकलेली आहे. त्यामुळे सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ चा अथवा वादींचा कसलाही हक्क हितसंबंध राहिलेला नाही. सदर प्रतिवादी क्र. ३ हा जून—२०१४ च्या शेवटच्या आठवडयामध्ये सदर मिळकतीमध्ये नांगरणी करण्यास गेला असता प्रतिवादी क्र. १ ने वादीस पुढे करून हरकत अडथळा करण्याचा प्रयत्न करू लागला. तसेच सदर दावा दाखल झाल्यानंतर देखील प्रतिवादी क्र. १ हा वादीस पुढे करून सदर मिळकतीमधील प्रतिवादी

क्र. ३ च्या वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे वादी व प्रतिवादी क्र. १ ने प्रतिअर्जात नमूद मिळकतीमधील प्रतिवादी क्र. ३ च्या वहिवाटीला हरकत अडथळा करू नये असा तातपुरता मनाई आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

२. सदर प्रतिअर्जाला वादींनी नि.क्र. ३६ ला म्हणणे देऊन अर्जातील कथन स्पष्टपणे नाकारलेले आहे. सदर म्हणण्यातील थोडक्यात कथन असे आहे की, मौजे पांढरेवाडी, ता. पंढरपूर येथील गट क्र. ९१/२/ब/१ क्षेत्र ८३ आर. पो.ख. ५ आर. ची मिळकत वादी व प्रतिवादी क्र. १ च्या वडिलार्जित मालकी वहिवाटीची असून त्या हक्काने सदर मिळकतीमध्ये वादी उत्पन्न घेत आहेत. सदर मिळकतीचे वादी व प्रतिवादी क्र. १ मध्ये वाटप झालेले नाही. सदर मिळकतीशी प्रतिवादी क्र. २ व ३ चा कोणताही हक्क हितसंबंध नाही. परंतु प्रतिवादी क्र. ३ हे दावा मिळकतीमधील हक्काबाबत गावामध्ये भाषा बोलू लागल्याने वादींनी अधिक चौकशी केली असता प्रतिवादी क्र. २ हे सावकारी करणारे इसम असल्याचे व प्रतिवादी क्र. २ ने प्रतिवादी क्र. १ कडून सदर मिळकतीपैकी ४० आर. मिळकतीबाबत दि. ०२/०१/२०१३ रोजी खरेदीखत करून घेतल्याचे आढळून आले. सदरचा दस्त पोकळ, बनावट व बिनभरण्याचा आहे. सदरचा दस्त प्रतिवादी क्र. १ ने स्वतःच्या चैनीसाठी करून दिल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ ला दावा मिळकतीपैकी विशिष्ट क्षेत्र हस्तांतरीत करण्याचा हक्क नव्हता व नाही. त्यामुळे सदर खरेदीखताने प्रतिवादी क्र. २ ला कोणतेही अधिकार प्राप्त झाले नाहीत. सदर प्रतिवादी क्र. २ ने सदर मिळकतीबाबत प्रतिवादी क्र. ३ च्या नावे दि. २२/०५/२०१४ रोजी खरेदीखत

अस्तित्वात आणलेले आहे. सदर खरेदीखताने देखील प्रतिवादी क्र. ३ ला कोणतेही अधिकार प्राप्त झालेले नाहीत. सदर दि. २२/०५/२०१४ रोजीचे खरेदीखत प्रतिवादी क्र. २ व ३ ने संगनमत करून बेकायदेशीरपणे अस्तित्वात आणलेले आहे. सदर बेकायदेशीर खरेदीखताच्या आधारे प्रतिवादी क्र. ३ हे दावा मिळकतीमध्ये बेकायदेशीरपणे कब्जा करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे सदरचा दावा व नि.क्र. ५ वरील अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. सदर प्रतिवादी क्र. ३ ने दाखल केलेल्या प्रतिदाव्यास व अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची वादींनी विनंती केली आहे.

३. सदर अर्जाला प्रतिवादी क्र. १ ने नि.क्र. ४२ ला कैफियत दाखल करून प्रतिदाव्यातील संपुर्ण कथन स्पष्टपणे नाकारलेले आहे. सदर कैफियतमधील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिदाव्यात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ३ चा मिळकतीमध्ये कब्जा नाही. त्यामुळे सदरचा प्रतिदावा खर्चासह नामंजूर करण्याची सदर प्रतिवादी क्र. १ ने विनंती केली आहे.

४. सदर प्रकरणातील अर्जामधील व म्हणण्यामधील कथन विचारात घेऊन सदरचा अर्ज निकाली काढण्याकरीता मी खालील मुद्दे विचारात घेतलेले आहेत. सदर मुद्दयांना कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | अर्जात नमुद मागणीबाबत प्रथमदर्शनी केस प्रतिवादी क्र. ३ च्या लाभात असल्याचे प्रतिवादी क्र. ३ सिध्द करतो का ? | : | .. नाही. |

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| २ | अर्जात नमुद मागणीबाबत न्यायाचा समतोल प्रतिवादी क्र. ३ च्या बाजूने असल्याचे प्रतिवादी क्र. ३ सिध्द करतो का ? | : | .. नाही. |
| ३ | सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादी क्र. ३ चे अपरिमीत हानी होणार असल्याचे प्रतिवादी क्र. ३ सिध्द करतो का ? | : | .. नाही. |
| ४ | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

५. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. ३ व प्रतिवादी क्र. ३ तर्फे विद्वान वकील गैरहजर असल्याने युक्तिवाद ऐकण्यात आला नाही. वादींतर्फे विद्वान वकील श्री. बागल यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता</u>** :—

सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे कारणमीमांसेकरीता व निष्कर्षाकरिता सदर मुद्दे एकत्रीत घेण्यात आलेले आहेत.

६. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरून आणि वादींतर्फे विद्वान वकिलांच्या युक्तिवादावरून सर्वप्रथम याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, वादींनी सदरचा दावा वाटपाकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला असून सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. ३ ने <u>नि.क्र. २९</u> ला म्हणणे व कैफियत दाखल केलेली आहे. तसेच <u>नि.क्र. २९</u> सोबत प्रतिवादी क्र. ३ ने निरंतर मनाई हुकूमाबाबत प्रतिदावा दाखल केला आहे. सदर प्रकरणातील वादींनी <u>नि.क्र. ५</u> ला दावा कलम १(ब) मध्ये नमूद मिळकतीमधील वादींच्या वहिवाटीस प्रतिवादी क्र. ३ ने हरकत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई आदेश पारित करण्याकरीता दाखल केला आहे. तसेच सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र. ३ ने सदरचा अर्ज गट क्र. ९१/२ब/१ पैकी पुर्वेकडील ४० आर. जमिनीमधील प्रतिवादी क्र. ३ च्या वहिवाटीस वादी व प्रतिवादी क्र. १ ने हरकत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई आदेश पारित करण्याकरीता दाखल केला आहे. सदर प्रकरणातील वादी क्र. १ व २ हे वादी क्र. ३ व प्रतिवादी क्र. १ ची मुले असल्याबाबत पक्षकारांमध्ये वाद नाही. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र. १ ने दाव्याला अद्याप कैफियत दाखल केलेली नाही. याउलट प्रतिवादी क्र. १ ने <u>नि.क्र. २९</u> वरील प्रतिदाव्याला <u>नि.क्र. ४२</u> ला कैफियत दाखल करून प्रतिदाव्यातील संपुर्ण कथन स्पष्टपणे नाकारलेले आहे.

७. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र. ३ ने अर्जामध्ये अर्जात नमूद मिळकत ही प्रतिवादी क्र. १ च्या खरेदी मालकीची असल्याचे कथन केले आहे. परंतु त्याबाबत सद्य परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र. ३ ने कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. याउलट सदर प्रकरणातील वादींनी दावा कलम १(ब) मध्ये नमूद मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. १ ची वडिलार्जित मालकी वहिवाटीची

असल्याचे कथन केले आहे. सदर प्रकरणातील वादींनी नि.क्र. ४/२ ला अर्जात नमूद मिळकतीचा सन २०१३—१४ चा ७/१२ उतारा दाखल केलेला असून सदर ७/१२ उताऱ्यासदरी भोगवटदार म्हणून प्रतिवादी क्र. १ व प्रतिवादी क्र. ३ चे नाव दाखल आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र. ३ ने अर्जामध्ये अर्जात नमूद मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. १ ची वडिलार्जित मालकी वहिवाटीची असल्याच्या मतास कोर्ट आल्यास प्रतिवादी क्र. १ च्या हिश्याची मिळकत प्रतिवादी क्र. ३ च्या हिश्याला टाकण्यात यावी असे कथन केले आहे. त्यामुळे सद्य परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र. ३ ने दावा कलम १(ब) मध्ये नमूद मिळकत ही प्रतिवादी क्र. १ च्या स्वतंत्र मालकीची असल्याबाबत कोणतीही कागदपत्रे दाखल न केल्यामुळे सदरची मिळकत वादी व प्रतिवादी क्र. १ च्या वडिलार्जित मालकीची असल्याचा निष्कर्ष निघतो. सदर प्रकरणातील वादी व प्रतिवादी क्र. १ मध्ये दावा कलम १(ब) मध्ये नमूद मिळकतीचे वाटप झाल्याबाबत कोणतीही कागदपत्रे वादींनी अथवा प्रतिवादींनी दाखल केलेली नाहीत.

८. सदर प्रकरणातील वादींनी नि.क्र. ४ सोबत दावा कलम १(ब) मध्ये नमूद मिळकतीपैकी पुर्वेकडील ४० आर. मिळकतीच्या खरेदीखताबाबत दि. ०२/०१/२०१३ व दि. २२/०५/२०१४ रोजीची सुची क्र. २ ची नक्कल दाखल केलेली आहेत. सदर नकलेवरून याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, प्रतिवादी क्र. १ व २ मध्ये अर्जात नमूद दावा कलम १(ब) मधील मिळकतीपैकी पुर्वेकडील ४० क्षेत्राबाबत खरेदीखत अस्तित्वात आलेले असून सदर क्षेत्राबाबत दि. २२/०५/२०१४ रोजी प्रतिवादी क्र. २ व ३ मध्ये खरेदीखत अस्तित्वात आल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच सदर प्रकरणातील वादींनी दाखल केलेल्या ७/१२ उताऱ्यावरील नोंदीवरून देखील स्पष्ट होते की,

प्रतिवादी क्र. ३ चे ४० क्षेत्राबाबत भोगवटदार म्हणून दाखल झाले आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादींनी अथवा वादींनी दि. ०२/०१/२०१३ व दि. २२/०५/२०१४ रोजीचे खरेदीखत दाखल केलेले नाही. तसेच वर नमूद चर्चेवरून स्पष्ट होते की, अर्जात नमूद मिळकतीबाबत वादी व प्रतिवादी क्र. १ मध्ये वाटप झाल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होत नसल्याने वादी व प्रतिवादी क्र. १ मध्ये वाटप झाल्याशिवाय प्रतिवादी क्र. १ ला वडीलांर्जीत मिळकतीमधील विशिष्ट क्षेत्र विक्री करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.

९. तसेच याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदर प्रकरणातील प्रतिवादी क्र. १ ला वडीलार्जीत मिळकतीमधील हिस्सा विकण्याचा पुर्ण अधिकार असला तरी वादी व प्रतिवादी क्र. १ मध्ये वडीलार्जीत मिळकतीबाबत वाटप झाल्याशिवाय खरेदीदाराला खरेदीखतानुसार कब्जा प्राप्त होणार नाही. त्यामुळे सदर प्रकरणातील वादी व प्रतिवादी क्र. १ मध्ये दाव्यात नमूद मिळकतीचे वाटप झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नसल्याने प्रतिवादी क्र. ३ ला दि. २२/०५/२०१४ रोजीच्या खरेदीखताप्रमाणे मिळकतीचा कब्जा मिळाल्याचा निष्कर्ष सद्य परिस्थितीमध्ये निघत नाही. तसेच वादी व प्रतिवादी क्र. १ मध्ये दाव्यात नमूद मिळकतीबाबत वाटप झाल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होत नसल्याने वादींची दाव्यात नमूद संपुर्ण मिळकतीमध्ये सामाईकात वहिवाट असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. ३ ला दि. २२/०५/२०१४ रोजीच्या खरेदीखतानुसार मिळकतीचा कब्जा मिळाल्याचा निष्कर्ष सद्य परिस्थितीमध्ये प्रथमदर्शनी निघत नाही. त्यामुळे सदर प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रावरून प्रतिवादी क्र. ३ ला अर्जात नमूद केल्याप्रमाणे मिळकतीचा कब्जा मिळाल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होत नाही. त्यामुळे अर्जात नमूद

मिळकतीमधील कब्जे—वहिवाटीबाबत प्रतिवादी क्र. ३ च्या लाभात प्रथमदर्शनी केस व न्यायाचा समतोल असल्याचे दाखल कागदपत्रावरून सिध्द होत नाही. त्यामुळे वर नमूद चर्चेवरून आणि सदर प्रकरणातील कागदपत्रावरून माझे असे मत झाले आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदींनुसार अर्जात मागणी केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई आदेश पारित करण्यासाठी लागणारे घटक प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरिमीत हानीचा मुद्दा प्रतिवादी क्र. ३ च्या बाजुने असल्याचे प्रतिवादी क्र. ३ ने सिध्द केलेले नाही. त्यामुळे मी **मुद्दा क्र. १ ते ३** ला **'नकारार्थी'** निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ करीता** :—

१०. वर नमूद चर्चा व सदर प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदींनुसार तात्पुरता मनाई आदेश पारीत करण्यासाठी लागणारे महत्वाचे घटक प्रतिवादी क्र. ३ ने सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. नि.क्र. ३१ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात आला.

सही/—

दिनांक — ०७/०३/२०१५

( शि. म. गौरगोंड )

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर.